**सं.फौ.ख.क्र.२७९/२०२३**
**सरकार वि. पुरूषोत्तम**
**नि.क्र.११ च्या खाली**

साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–किर्तीधर लक्ष्मणराव कामडी,
वय ५५ वर्ष, व्यवसाय–खाजगी
राह.गिरडकर ले.आउट उमरेड, ता.उमरेड,जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू**

**१.** पोलिसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्याकामी घटनास्थळावर बोलवले नव्हते. पोलिसांनी माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा केला नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. सहीला **निशानि क्र.१२** देण्यात आले. आता मला झडतीपत्रक दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. सहीला **निशानि क्र.१३** देण्यात आले.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि.१२/११/२०२२ रोजी मौजा हेटी येथे पोलिसांनी मला घटनास्थळावर पंचनामा करण्याकामी बोलविले होते व आरोपीच्या ताब्यातुन १८० मिलीच्या देशी दारूच्या १५ निपा, एक मातीचा माठ, तीन काचेचे ग्लास व एक प्लास्टीक मघा जप्त केले होते व माझ्यासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला मला वाचुन दाखविला त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याची खात्री करून मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ओळखीचा असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**
**आरोपीतर्फे वकील श्री.एस.जी.फलके यांनी उलटतपास नाकारला.**
**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१४.११.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड